# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**वस्त्रोद्योग मंत्री** : "महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(गुरूवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१) व (२)] —**

(१) **सर्वश्री सतिश चव्हाण, विक्रम काळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर ही वैद्यकीय संस्था ७० वर्षापुर्वी स्थापित झाली असणे, या वैद्यकीय संस्थेत मराठवाडयासह विदर्भ, खानदेश व पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांशी रुग्ण हे वैद्यकीय उपचारासाठी येत असणे, रुग्णांना योग्य वैद्यकीय उपचार व भौतिक सुविधा मिळण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेस अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचा (एम्स) दर्जा मिळाला तर या वैद्यकीय संस्थेस दोन ते तीन हजार कोटीचे अतिरिक्त अर्थसहाय्य मिळू शकते आणि या निधीतून वैद्यकीय संस्थेस सेवा सुविधांचा स्तर व गुणवत्ता उच्च पातळीवर नेण्यास सुलभ होणार असणे, वैद्यकीय संस्थेची विविध वसतिगृहे जुनी व अपुरी असल्याने सध्याच्या २१०० विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उपलब्ध होणार असणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे ऑल इंडीया इन्स्टिटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस (एम्स) दर्जा मिळण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी यासाठी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.हेमंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नांदेड जिल्ह्यातील कार्यरत असलेल्या शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ.यशवंत राजपाल पाटील यांनी आपल्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करून पात्र कर्मचाऱ्यांना अपात्र ठरवणे व अपात्रांना पात्र ठरविणे, तसेच विविध प्रशासकीय बाबींमध्ये नियमबाह्य निर्णय घेऊन गंभीर आर्थिक व प्रशासकीय अनियमितता केल्याच्या तक्रारी समोर येणे, या संदर्भात स्थानिक आमदारांनी आयुष संचालनालयाकडे लेखी तक्रार सादर करणे, संबंधित अधिकाऱ्यांशी असलेल्या कथित संबंधांचा प्रभाव वापरून प्रक्रियेत हस्तक्षेप झाल्याचा आरोप होणे, यामुळे महाविद्यालयाची शैक्षणिक प्रतिमा व प्रशासनाची पारदर्शकता धोक्यात येणे, ही अत्यंत गंभीर बाब असून सदर प्रकरणाची दखल घेऊन वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी चौकशीचे आदेश दिले असले तरी, चौकशीची व्याप्ती, कालमर्यादा व दोषींवर होणारी कारवाई याबाबत स्पष्टता नसल्याने शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री. योगेश टिळेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"संत सावता महाराज यांचा अरण येथे होणारा संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने निघणाऱ्या पांडुरंगाच्या पालखीचे नियोजन व व्यवस्थापन हे विठ्ठलरुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांनी स्वखर्चातून करण्याबाबतची मागणी भाविक भक्तांकडून होत असणे, हजारो भाविक भक्त या पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होत असून येथील काशीकापडी समाजाला पालखीचा मान असणे, पालखी सोहळ्यामध्ये दिवसेंदिवस भाविकांची संख्या वाढू लागली असल्याने पांडुरंगाच्या पालखीचे नियोजन व व्यवस्थापन हे विठ्ठलरुक्मिणी मंदिरे समितीने स्वखर्चातून केले जात असणे, सोहळ्यातील भाविकांना चांगल्या सोईसुविधा मिळणे आवश्यक असणे, दरवर्षी विठ्ठलरुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर पांडुरंगाची पालखी आळंदी आणि मुक्ताईनगर येथे संत भेटीसाठी घेऊन जात असतात त्यावेळी समितीकडे असलेल्या पादुका मिरवणुकीने नेल्या जाते, त्याचप्रमाणे या वर्षीपासून पांडुरंगाच्या पालखीचे प्रस्थान श्री विठ्ठल मंदिरातून करावे, यासाठी विठ्ठलरुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांनी पुढाकार घ्यावा व समिती कडे असलेल्या पादुका मिरवणुकीने नेल्या जाव्यात अशी मागणी पंढरपूर येथील फराताळे दिंडी मठामध्ये झालेल्या बैठकीत संत शिरोमणी सावता महाराज धर्मादाय न्यास आणि भक्त परिवाराच्या वतीने करण्यात येणे, यासाठी संत सावता महाराज यांचा अरण येथे होणारा संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने निघणाऱ्या पांडुरंगाच्या पालखीचे नियोजन व व्यवस्थापन हे विठ्ठल मंदिर समितीने स्वखर्चातून करण्याबाबतचे निर्देश शासनाने देण्याची आवश्यकता यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाने राज्यातील नदीकाठी व जलाशय परिसरातील गाळपेरीच्या जमिनी जलसंपदा विभागाच्या ताब्यात घेऊन त्या ठिकाणी कंपाऊंड उभारण्याचा तसेच सदर जमिनी पी.पी.पी. (Public Private Partnership) तत्त्वावर खाजगी संस्थांना विकास व व्यवस्थापनासाठी देण्याचा निर्णय घेतला असणे, या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम उजनी धरण परिसरातील हजारो शेतकरी व मत्स्य व्यवसायिकांवर होणार असणे, उजनी धरणाच्या उभारणीदरम्यान अनेक स्थानिक शेतकऱ्यांनी आपली सुपीक व कसदार जमीन जलाशयासाठी दिली असणे, त्यावेळी शासनाकडून अत्यल्प मोबदला देऊन पुनर्वसन करण्यात आलेले असणे, परिणामी अनेक बाधित कुटुंबे उपजीविकेच्या शोधात पुढील अनेक वर्षे उजनी बॅकवॉटर परिसरातील गाळपेरीच्या जमिनीवर शेती करून आपला उदरनिर्वाह चालवत असणे, परंतु सदर निर्णयामुळे उजनीकाठच्या हजारो एकर गाळपेरीची जमीन थेट शासनाच्या ताब्यात जाणार असून अनेक वर्षांपासून शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे उपजीविकेचे साधन हिरावले जाण्याची भीती निर्माण झाली असणे, तसेच जलाशय परिसर खाजगी संस्थांच्या ताब्यात गेल्यास मासेमारीवर निर्बंध येऊन उजनीतील हजारो मत्स्य व्यवसायिकांवरही मोठे संकट निर्माण होणार असणे, यामुळे उजनी धरण परिसरातील गावांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, सदर निर्णयाला स्थानिक नागरिक, शेतकरी व मच्छीमारांचा होत असलेला विरोध, यामुळे सदर निर्णयाचा पुनर्विचार करून बाधित होणाऱ्या शेतकरी व मच्छीमारांना न्याय देण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री.कृपाल तुमाने, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर मार्गे राज्यात मोठ्या प्रमाणात विदेशी सुपारी (Areca Nut) बेकायदेशीररित्या येत असल्याची बाब निदर्शनास येणे, सदर विदेशी सुपारी अत्यंत निकृष्ट दर्जाची असून योग्य आयात नोंदी अथवा वैध कागदपत्रांशिवाय राज्यात आणली जात असणे, सदर प्रकार वारंवार उघडकीस येणे, नागपूर हे देशाच्या मध्यवर्ती स्थानी असल्यामुळे मोठे वाहतूक व वितरण केंद्र असल्याने या मार्गाचा वापर करून संबंधित माल राज्यातील विविध जिल्ह्यांत पाठविला जात असल्याचे निदर्शनास येणे, वाहतुकीदरम्यान बनावट कागदपत्रे, करचोरी तसेच इतर अवैध व्यवहार झाल्याचे आढळून येणे, तसेच या माध्यमातून अंमली पदार्थ किंवा इतर प्रतिबंधित वस्तूंची वाहतूक होत असल्याची शक्यताही तपास

यंत्रणांकडून व्यक्त करण्यात येणे, याप्रकारामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य तसेच वैध व्यापारावर विपरीत परिणाम होणे, सदर प्रकरणात अनेक अधिकारी सहभागी असल्याची शक्यता असणे, शासनाने सदर प्रकरणाची पारदर्शक चौकशी करून दोषी आढळून येणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची तसेच भविष्यात अशा बेकायदेशीर वाहतुकीला आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात २१० साखर कारखान्यांनी गाळप हंगाम सुरु केला असून आतापर्यंत २७ कारखाने बंद झाले असून माहे फेब्रुवारीपर्यंत आणखी ५० ते ६० साखर कारखान्याने बंद होणे, यापूर्वी माहे मे पर्यंत कारखाने चालत होते आता ऊसाचे उत्पादन कमी होत असल्याने फेब्रुवारीला कारखाने बंद होणे, साखर उताऱ्यात घट आल्याने एफआरपीवर परिणाम होणे, असे असतानाही साखर आयुक्तालयाने ४५ साखर कारखान्यांना थकीत रुपये १८६० कोटी एफआरपी बाबत दिनांक १५ फेब्रुवारीला नोटीस काढल्या असून एकूण थकीत एफआरपीची रक्कम ४००० कोटी पेक्षा जास्त असणे, कारखान्यांना एफआरपी देणेही अशक्य होणे, साखरेचे दर प्रती क्विंटल ३६०० ते ३७०० रुपये असल्याने एफआरपी देण्याकरिता अत्यंत कमी रक्कम उपलब्ध होणे, राज्याने केंद्रशासनाकडे साखरेचे किमान दर ४२ रुपये करणे व इथेनॉलच्या दरातही वाढ करण्याबाबत मागणी करूनही अद्याप कोणताही ठोस निर्णय होत नसल्याने शेतकरी व साखर कारखाने अर्थिक अडचणीत सापडणे, राज्यातील कारखान्यांनी मोठ्या प्रमाणात अल्पमुदत कर्ज घेतले असून त्यांची परतफेड करणे अशक्य झालेले असतानाही शासनाने काही मर्जीतील साखर कारखान्यांना एनसीडीसी कडून कर्ज दिले असणे, तरी उर्वरित साखर कारखान्याची शासनाने हमी देऊन जाचक अटी रद्द करुन कर्जाचे पुनर्गठन करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**सहा : सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस) खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

**१)** मुख्यमंत्री

**२)** उप मुख्यमंत्री (नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), गृहनिर्माण)

**३)** उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, अल्प संख्यांक विकास व औकाफ)

**४)** महसूल मंत्री

**५)** अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

**६)** जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री

**७)** वैद्यकीय शिक्षण मंत्री

**८)** उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री

**९)** जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री

**१०)** वने मंत्री

**११)** पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

**१२)** शालेय शिक्षण मंत्री

**१३)** मृद व जलसंधारण मंत्री

**१४)** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री

**१५)** उद्योग, मराठी भाषा मंत्री

**१६)** पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री

**१७)** इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री

**१८)** आदिवासी विकास मंत्री

**१९)** पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री

**२०)** कृषी मंत्री

**२१)** महिला व बालविकास मंत्री

**२२)** सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

**२३)** ग्रामविकास व पंचायत राज मंत्री

**२४)** सामाजिक न्याय मंत्री

**२५)** परिवहन मंत्री

**२६)** रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री

**२७)** मदत व पुनर्वसन मंत्री

**२८)** मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री

**२९)** कामगार मंत्री

**३०)** सहकार मंत्री

**३१)** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

**सात : शासकीय विधेयके –**

(क) **विधानसभेने संमत केल्यास – विधेयक विचारात घेणे :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२६"

(ख) **विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विधेयक विचारात घेणे :-**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र कर, व्याज शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६

(ग) **विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

(१) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०९ — महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२५

---

आठ : (क) **(मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६, बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ व गुरूवार दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (मंत्र्यांचे उत्तर)**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, सदाशिव खोत, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, सर्वश्री सतिश चव्हाण, दादाराव केचे, श्रीमती भावना गवळी, श्री. पंकज भुजबळ, डॉ. परिणय फुके, सर्वश्री कृपाल तुमाने, संजय खोडके, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, अमोल मिटकरी, योगेश टिळेकर, चंद्रकांत रघुवंशी, शिवाजीराव गर्जे, अमित गोरखे, इद्रिस नायकवडी, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री संजय केणेकर, संदीप जोशी, वसंत खंडेलवाल, प्रसाद लाड, अमरिशभाई पटेल, ॲड. निरंजन डावखरे, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री. धर्मगुरू बाबूसिंग राठोड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी 'AI for Agri २०२६' ही परिषद शेतक-याला जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतक-यांच्या

आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांतून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांमुळे शेडयुल १ मधून शेडयुल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, सन २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

(ख) **(गुरूवार दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** — **(चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

**श्री. सतेज उर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील शेतक-यांना सरसकट व संपूर्ण कर्जमाफी, मोफत वीज पुरविणे, शेतमालाला हमीभाव देणे इत्यादी घोषणांचा शासनाने पाऊस पाडणे, त्यातच शेतकरी अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, गारपीट या निसर्गकोपामुळे उद्‌ध्वस्त होणे, अद्यापही शेतक-यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याने त्यांच्यावर दुहेरी संकट ओढवणे, पीक विमा कंपन्या कडून शेतक-यांना अत्यल्प नुकसान भरपाई मिळणे, १ रुपयात पिक विमा ही योजना शेतक-यांसाठी कि कंपन्यासाठी याबाबत संशय निर्माण होणे, दावोस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत राज्यातील अनुक्रमे १५.७० आणि ३७.२७ लाख कोटी रुपयांचे ५४ आणि ५१ सामंजस्य करार करण्यात येणे, यापैकी एकही नवीन उदयोग राज्यात उभारला

नसणे, परंतु टाटा एअर बस, वेदांता, सॅफ्रेन इत्यादी अनेक मोठे प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे नवीन रोजगार निर्मितीचा केवळ फुगवटा निर्माण करणे, कौशल्य विकास केंद्राच्या आकडेवारीनुसार राज्यात सुमारे ७१ लाख बेरोजगारांची नोंद होणे, राज्यात गतवर्षामध्ये मंत्री महोदयांवर भ्रष्टाचाराचे आरोप होवूनही कुठलीही कार्यवाही झाली नसल्याने आता त्यांच्या दालनापर्यंत लाचखोरीचे प्रकरण पोहचले असणे, तथापि शासन अशा मंत्री महोदयांना अभय देत आहे, भ्रष्टाचाराचा नवीन प्रकार शासनामध्ये सुरु झाला असे, निविदा काढणे, किरकोळ निधी उपलब्ध करुन देणे व ठेकेदाराची देयके थकविणे या प्रकरणी अनेक ठेकेदारांनी आंदोलने व आत्महत्या करणे, शिक्षकांचे विविध प्रश्न प्रलंबित असणे, शासन विकासाच्या गप्पा मारत असून नियोजन शून्यतेमुळे मुंबई - पुणे एक्सप्रेसवेवर ३० तास वाहतूक ठप्प झाली व अन्न-पाण्याविना नागरिकांचे अतोनात हाल होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**नऊ : अशासकीय ठराव :-**

**(मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) —**

**(१) श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २**

"मौजे कटगुण (ता.खटाव, जि. सातारा) या गावाला पर्यटनाचा "ब" दर्जा देऊन याठिकाणी असलेले राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले स्मारकाला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

**(२) डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७८**

"अधिवास (डोमेसाईल) प्रमाणपत्र हे राज्याचे रहिवासी असल्याचे सिद्ध करणारा एक महत्त्वाचा आणि आवश्यक दस्तऐवज असून राज्यातील शिक्षण, शासकीय नोकऱ्या व विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी वापरण्यात येतो. सदर प्रमाणपत्र मिळणेसाठी किमान १५ वर्षे सलग वास्तव्य असल्यास दिले जात असणे, सन २०१० नंतर राज्यात स्थलांतरित झालेल्या नागरीकांना डोमेसाईल मिळणार असून राज्यातील विविध योजनांचा लाभ घेण्यास अनेक

परप्रांतीय पात्र ठरत असणे, परिणामी राज्यातील मूलनिवासी नागरिकांवर याचा मोठा परिणाम होत असणे, यावर आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(३) श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७६**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२६.

**डॉ. विलास आठवले**,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.